

# समकालीन भारतीय साहित्य आणि भाषा

डॉ. अशोक खैरनार | डॉ. विजय बच्छाव
डॉ. किशोर पाटील | डॉ. प्रविण बोरसे

अथर्व पब्लिकेशन्स्

Scanned by CamScanner

- **''स्त्री के संघर्षमय जीवन का चित्रण''**(मैत्रेयी पुष्पा के 'विजन' उपन्यास के विशेष संदर्भ में) .................... १३५
  प्रा.डॉ.ए.जे.बेवले
- **१९६० नंतरच्या समकालीन कवयित्रींच्या कवितेचा अभ्यास** .................................... १३८
  प्रा. डॉ. रमेश तुकोजीराव देशमुख
- **फुले-आंबेडकरवादी साहित्य आणि समकालीन वास्तव** .................................. १४२
  प्रा. डॉ. विजय पाटील
- **अलका सारावगी के उपन्यास में नारी जीवन की त्रासगी** ('कलि-कथा: वाया बाईपास' उपन्यास के संदर्भ में) ....... १४५
  प्रा.डॉ. एस.आर. सांगोळे
- **साठोत्तरी दलित साहित्य** ............................... १४८
  डॉ. मोहिते फुलचंद मो.
- **अहिराणी बोलीभाषेतील लोकसाहित्याचे 'सांस्कृतिक महत्त्व'** .................................. १५१
  प्रा.डॉ. सुधा मधुकर खराटे
- **साठोत्तरी मराठी साहित्याचे अध्यापन** ................. १५४
  प्रा. डॉ. शारदा मोरे




Scanned by CamScanner

# अहिराणी बोलीभाषेतील लोकसाहित्याचे 'सांस्कृतिक महत्त्व'

**प्रा.डॉ. सुधा मधुकर खराटे**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल, जि. जळगाव.

खानदेश क्षेत्रात बोलली जाणारी एक लोकभाषा म्हणून अहिराणी बोली प्रचलित आहे. खानदेशातील ही केंद्रवर्ती बोली आहे. याशिवाय लेवापाटीदारी, गुजरी, लाडसिक्की, पावरी, काटोनी, तडवी, भिल्ली, वंजारी इ. बोली बोलल्या जातात. या सर्वच बोलीमध्ये लोकवाङ्मय मौखिक स्वरूपात प्रचलित आहे. अहिराणी बोलीला लोकवाङ्मयाचा समृध्द वारसा लाभलेला आहे.

या लोकवाङ्मयातून लोकसंस्कृती, रुढी, परंपरा, लोकमानस, समाजजीवन, जीवनविषयक तत्त्वज्ञान, कृषी संस्कृती, मानवी स्वभावाची विविधता यांचे प्रत्ययकारी चित्रण आलेले आहे. खानदेशी लोकसंस्कृती व लोकजीवनाचा काव्यमय इतिहास अहिराणी लोकवाङ्मयाच्यारूपाने सुरक्षित आहे. या वाङ्मय निर्मितीत स्त्रियांचा वाटा मोठा आहे. अहिराणीच्या लोकवाङ्मयात लोककथा, लोकगीतं, लोकनाट्य, लोककथा, म्हणी, अहिणं, उखाणे इ.चा समावेश होतो.

फार पूर्वीपासून प्रत्येक लोकसमुहात लोकरंगभूमीची निर्मिती झालेली आढळते. निखळ मनोरंजन व काही प्रमाणात लोकप्रबोधन हे त्याचे कारण आहे. लोकनाट्य प्राचीन काळापासून लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. लोकांनी लोकांसाठी केलेलं नाट्य म्हणजे लोकनाट्य यात सोंगी भजने, कलगीतुऱ्याचे फड, वही गायन, वासुदेवाचे नाट्य, तमाशा, बहुरूपी खेळ या लोककलांचा समावेश होतो. या लोकनाट्यातून लोकमानसाचे प्रतिबिंब उमटते, लोकसंस्कृती दर्शन घडते. नृत्य, संगीत, गीत व नाट्य यातून सहज उत्स्फूर्त संवादातून लोकमनोरंजन केले जाते.

अहिराणी भाषेत लोकगीतांचे एक समृध्द आणि प्रभावी दालन आहे. यात महिलांचा सहभाग मोठा आहे. अनेक मौखिक गीतं परंपरेने चालत आलेली आहेत. लोकगीतं अंतरीच्या उमाळ्यातून आलेली आहेत.

विवाहविषयक गीतांतून खानदेशातील संस्कृती प्रत्ययास येते लग्नाच्या पध्दती, परंपरा, रुढी यातून जाणवते. विविधप्रकारचे विधी समजून येतात. खानदेश संस्कृतीचा ठसा आपल्याला लोकगीतातून आढळतो. खानदेशी स्त्री ही मुळात धार्मिक प्रवृत्तीची व श्रध्दाळू आहे. परंपरेने चालत आलेले विधी, सण, उत्सव, उपासना, कुलाचार पार पाडण्यात तिचा महत्त्वाचा वाटा आहे.



Scanned by CamScanner

स्त्रीचा विधीशी प्रत्यक्ष सहभाग असतो. लग्नविधीतील अनेक प्रसंगांना गीतांची जोड दिलेली आढळते. ही गीते प्रामुख्याने स्त्रियाच गातात. हळद लावण्याचा विधी, वधुवरांना आंघोळ घालण्याचा विधी इ. प्रसंगी स्त्रिया गीत गातात.

आंघोळ करतांना गीत म्हणतात,

नवरा नवरी ग कशा न्हाती
तेच पानी ग वने जाती
वने पानी ग मोर पीती
...........
नवरा नवरीले बलाइतोऽ
मखमलीचा इडा देतो...

या गीतातून लग्नाच्या पध्दती, खाद्यपदार्थांची नावे, गावांची नावे, नाते संबंध या गोष्टी सहजतेने येतात. प्रत्यक्ष देव विवाहप्रसंगी हजर राहून कामं करू लागतात ही या स्त्रियांची भावना. गीतांमध्ये सर्व देव, पवित्र नद्या, निसर्ग, पूर्वज, आई-वडील यांच्याबद्दल कृतज्ञता दिसून येते.

सकाळी जाग आल्यावर प्रथम परमेश्वराचे, रामाचे स्मरण करण्याची संस्कृती अनुभवायला येते. ओवीगीतात ही स्त्री म्हणते

सकायी उठूनी, रामनं नाव लेवू
उजवा पाय, धरतीवर मी ठेवू

'राम' हे संपूर्ण भारतीयांचे आराध्य दैवत उठल्यानंतर प्रथम स्मरण करायचे ते देवाचे म्हणजेच रामाचे परमेश्वराच्या नामस्मरणाने दिवसाला प्रारंभ करायचा.

सकायी उठूनी, घालू सूर्याले दंडक
पहिली गाऊ वही, पहिली ववीना मंडप ।

मानवी जीवनात आणि निसर्ग जीवनात जे तेजस्वी, उदात्त, दिव्य, भव्य, प्रकाशमान आहे त्यापुढे ही स्त्री नतमस्तक होते. सर्व विश्वाचे जीवन विकसित करणारा, सर्वांना प्रकाश देणारा सूर्य तिच्यादृष्टीने परमेश्वर आहे. या सूर्यदेवतेला ती मनापासून दंडक घालते, त्याला विनवते. तुझा प्रकाश माझ्यात येऊ दे. माझीही बुध्दी तेजस्वी होऊ दे. दळण दळतांना शेवटी ती ओवी गाते,

सरनं दयनं हाई, सरनं म्हनू नही
पोटे व कच्चाबच्चा, मुकं मुकं दऊ नही

दळण संपलं असं कधी म्हणू नये. कारण पोटी लहान मुलं आहेत. पुन्हा जात्यावर बसावेच जागेला दळतांना मुक्याने कधीही दळू नये हा विचार ही स्त्री व्यक्त करते. सानेगुरुजी ओव्याविषयी मते व्यक्त करतात की ज्या वाङ्मयात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला आहे असे वाङ्मय म्हणजे ओवी



वाङ्मय.

अहिराणी लोककथांमधूनदेखील सांस्कृतिक मूल्य दिसून येते. नीतीबोधपर अनेक कथा अहिराणी भाषेत दिसून येतात. त्यात शंकर पार्वतीच्या अनेक कथा आहेत. पौराणिक कथांमधून लोकमानस प्रतिबिंबीत होते. अहिराणी लोककथा धर्म, सश्रध्दा, प्रथा, परंपरा, रुढी, संकेत, चालीरिती इ. संस्कृतीच्या घटकांचं वहन करतात. कथांमधून खानदेशी कुटुंबसंस्था, सामाजिकता याची कल्पना येते.

अहिराणी म्हणी, वाकप्रचार, उखाणे यातूनदेखील सांस्कृतिक मूल्य जाणवते. त्यातून लोकसंस्कृती दिसून येते. म्हणी नैतिकतेचे शिक्षण देतात. समाजातील चालीरीती, रुढी, परंपरा यांचे प्रतिबिंब त्यात उमटते. नीतीशास्त्र, इतिहास यांचे संदर्भ येतात. उदा. आईबाईनी दिन्ही भर, उठवं धल्ली नवरा कर - इतर लोक खोटी स्तुती करून न शोभेल अशा गोष्टी करायला प्रवृत्त करतात. लग्नातील उखाण्यांवरूनदेखील धार्मिक संस्कृती दिसून येते. तसेच पुरूषप्रधान संस्कृती कळते. उदा. महादेवना पिंडवर वसनना येल...बसनात पुजाले ते मी देस बेल..

**संदर्भग्रंथ -**
१) अहिराणी लोकसाहित्य दर्शन खंड २ नाती-गोती - कृष्णा पाटील, पृ.५६
२) मराठी लोकगीत स्वरूप - विशेष - डॉ. शरद व्यवहारे, पृ.१०७



Scanned by CamScanner